PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Sai Darshan Ek Anubhav
Year: 2010

Song: Ashi Budhhi De
Lyricist: Santosh Darekar

अशी बुद्धी दे मज साईदेवा
श्रद्धा विश्वास दुबळा न व्हावा
अशी बुद्धी दे मज साईदेवा
श्रद्धा विश्वास दुबळा न व्हावा
सत्वशील मार्ग दावीलास आम्हां
तैसा मार्ग जगी तुम्ही दाखवावा
अशी बुद्धी दे मज साईदेवा
श्रद्धा विश्वास दुबळा न व्हावा
अशी बुद्धी दे मज

उठा जागे व्हा तुम्ही लोकनाथा
अनंत कोटी हे भगवंता
उठा जागे व्हा तुम्ही लोकनाथा
अनंत कोटी हे भगवंता
स्वार्थी जाहली सारी जनता
कर्तृत्वाची सांगावी गीता
कुरूक्षेत्र झाले या भूमीचे
मंत्र जगण्याचा कानी घुमावा
सत्वशील मार्ग दावीलास आम्हां
तैसा मार्ग जगी तुम्ही दाखवावा
अशी बुद्धी दे मज साईदेवा
श्रद्धा विश्वास दुबळा न व्हावा
अशी बुद्धी दे मज

सत्कर्म घडावे रोज रोज
अपराधाची वाटावी लाज
सत्कर्म घडावे रोज रोज
अपराधाची वाटावी लाज
मनी कारुण्य गंगा झरावी
जीवन बाग साऱ्यांची फुलावी
वैरी जरी कुणी असला आमचा
भाव मैत्रीचा मनी जागवावा
सत्वशील मार्ग दावीलास आम्हां
तैसा मार्ग जगी तुम्ही दाखवावा
अशी बुद्धी दे मज साईदेवा
श्रद्धा विश्वास दुबळा न व्हावा
अशी बुद्धी दे मज

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*